**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये वसुली दाखला देताना अवलंबवयाची कार्यपध्दती**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

जा.क्र.पतसंस्था/सआ 5/कलम 101/परिपत्रक/2021 /1323
दिनांक :- 13 जुलै, 2021.

**संदर्भ :-** या कार्यालयाचे दिनांक 4 जुलै, 2016 चे परिपत्रक.

## प रि प त्र क

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये सहकारी संस्थांच्या थकबाकी वसुलीसाठी सहायक निबंधक / उपनिबंधक, सहकारी संस्था यांचेकडून वसुली दाखला देण्यात येतो. सदर वसुली दाखला देताना अवलंबवयाची कार्यपध्दतीचा उहापोह महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 86 अ ते 86 फ मध्ये केलेला आहे. तसेच या कार्यालयाने उपरोक्त संदर्भीय परिपत्रक याबाबत निर्गमित केलेले आहे. त्यानुसार नियम 86 अ ते 86 फ मधील तरतुदी व सदर परिपत्रकांतील सूचनांप्रमाणे कार्यवाही होणे बंधनकारक आहे. मात्र, तालुका / वार्ड सहायक निबंधक / उपनिबंधक व फेडरेशनकडील प्रतिनियुक्तीवरील सहायक निबंधक / उपनिबंधक यांचेकडून सदर नियम 86 अ ते 86 फ व संदर्भीय परिपत्रकाचे आणि याबाबत मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेऊन त्याप्रमाणे काटेकोरपणे पालन होत नाही असे निदर्शनास आलेले आहे;

त्याअर्थी, या अनुषंगाने निदर्शनास आलेल्या बाबी विचारात घेऊन या परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:

1) अर्जदार संस्थेनी दाखल केलेला 'यू' नमूना अर्ज परिपूर्ण भरलेला असल्याची व त्यामधील येणे कर्ज बाकीचा तपशील कर्ज खाते उताऱ्याप्रमाणे बरोबर असल्याची आणि अर्जावर संस्थेच्या अधिकाऱ्याची शिक्क्यासह स्वाक्षरी असलेची खात्री करणेत यावी.
2) अर्जासोबतची सर्व कागदपत्रे (मंजूर केलेले कर्ज प्रकरण) कर्ज मागणी अर्ज, कर्जरोखा, वचन चिठ्ठी, कराराचे अन्य दस्तऐवज / कागदपत्रे इ. सर्व रकाने परिपूर्ण भरलेची व त्यामध्ये खाडाखोड नसलेची खात्री करणेत यावी.
3) अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे संस्थेच्या व्यवस्थापकाने खरी नक्कल म्हणून प्रमाणित केलेखेरीज प्रकरण दाखल करून घेण्यात येऊ नये.
4) सर्व कर्जदार व जामिनदार यांना संस्थेनी पाठविलेली लवादपूर्व नोटीस (कलम 101 अर्ज दाखलपूर्व नोटीस) ही अलीकडच्या काळातील असलेली खात्री करणेत यावी व त्याची पोच प्रकरणांस जोडलेचीही खात्री करावी.
5) अर्जासोबत जोडलेला कर्ज खाते उतारा हा व्यवस्थापक यांनी सही शिक्यानिशी प्रमाणित केलेला असावा. संगणकीय खाते उतारा असल्यास त्यावर व्यवस्थापक यांची सही व संस्थेचा शिक्का असावा. सदर कर्ज प्रकरणी व्याज व इतर आकारणी ही कर्ज रोख्यातील अटी व शर्तीप्रमाणे, संस्थेचे मंजूर उपविधी, नियमानुसार व एनपीएचे निकष विचारात घेऊन केलेली असल्याबाबत त्याखाली शेरा नमूद असावा.
6) सुनावणीची नोटीस रजिस्टर पोस्टाने किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता मधील तरतुदीनुसार बजावणी झालेची खात्री करणेत यावी. प्रत्येक प्रकरणी दाव्याचा क्रमांक नोटीसवर व पोस्टाच्या आरपीएडी पावती (Slip) वर नमूद करणेत यावा. सुनावणीच्या नोटीससोबत दावा अर्ज (यु नमुन्यातील) व अन्य कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती जोडण्यात याव्यात. नोटीस पोच झाल्याची खात्री करून सकृतदर्शनी सह्यामध्ये तफावत दिसत असेल अशा अर्ज प्रकरणी फेर सुनावणीची नोटीस देणेत यावी.

7) नोटीस बजावणी सर्व संबंधीत जाबदारांवर झालेचे खात्री सुनावणीचे वेळी करण्यात यावी.
8) नियम 86 मध्ये नमूद केलेप्रमाणे अर्जदार संस्थेने जमा करावयाची न्यायालय फी शासकीय कोषागारात जमा केलेचा पुरावा (चलन) प्रत्येक अर्जास जोडणेत यावा व याबाबत सहायक निबंधक / उपनिबंधक यांनी खात्री करावी.
9) संस्थेकडील 101 चे प्रकरण छाननीअंती परिपूर्ण असेल तरच ते नोंदवहीत नोंदविण्यात यावे व त्यानंतरच सुनावणी नोटीस काढणेत यावी.
10) कलम 101 ची प्रक्रिया ही अर्ध-न्यायीक (Quasi-Judicial) स्वरूपाची असल्याने रिट पिटीशन क्र.4101/2007 मधील दि.24/03/2009 रोजीच्या आदेशामध्ये नमूद "Procedural Guidelines for Quasi-Judicial Authority" या मधील लागू असलेल्या सर्वसाधारण सूचनांचे पालन करणेत यावे.
11) सुनावणीचे वेळी नियम 86 ई नुसार संस्थेकडून अर्जातील तपशीलाप्रमाणे सर्व मुद्दे पुराव्यासह सिध्द होत असलेची संस्थेकडून दावा प्रतिज्ञापत्र (क्लेम ॲफिडेव्हिट) घेऊन दावा शाबीत कशा प्रकारे केला याची नोंद रोजनाम्यात किंवा स्वतंत्र टिपणद्वारे घेऊन सर्व संबंधितांची स्वाक्षरी घेणेत यावी.
12) अर्ज एकतर्फी निकाली काढणेपूर्वी अर्जदार संस्थेनी दावा कशा प्रकारे सिध्द केला व अर्जदार संस्थेचे क्लेम ॲफिडेव्हिट (दावा प्रतिज्ञापत्र) घेऊनच तशी रोजनाम्यात नोंद करून घेणेत यावी.
13) सुनावणीचे काम पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर म्हणजे 7 दिवसात निर्णय द्यावा. नियम 86 फ प्रमाणे सर्व संबंधित पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर कारणमिमांसेसह अर्ज मान्य / अमान्यबाबत केलेला निर्णय, आदेश व आवश्यक असेल त्याप्रमाणे वसुली प्रमाणपत्र निर्गमित करणेत यावे.
14) नमुना 'व्ही' मध्ये वसूली प्रमाणपत्र देताना त्यामधील येणेबाकी मुद्दल, व्याजदर (जादा / दंड व्याज वगळून), सरळ व्याजाने होणारी आकारणी, इ. तपशील तपासूनच वसूली दाखला देण्यात यावा.
15) रिव्हीजनल अथॉरिटीने कलम 101 चा वसूली दाखला योग्य प्रकारे निर्गमित झाला हे पाहणेसाठी रोजनामा अन्य कागदपत्रांबरोबर सादर केलेला आहे का? याबाबत खातरजमा करावी.
16) वसुली अर्जावरील घेतलेला निर्णय, आदेश व प्रमाणपत्राची प्रत सर्व संबंधित जाबदार यांना तात्काळ रजिस्टर पोस्टाने किंवा समक्ष मागणी केल्यास हमदस्तद्वारे देण्यात यावी व त्याची पोच संबंधीत प्रकरणात ठेवणेत यावी.
17) संस्थेने अर्ज नोंदणी केलेनंतर सुनावणीच्या पहिल्या तारखेपासून शक्यतो 3 महिन्याच्या आत अंतिम निर्णय घेणेत यावा.
18) मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी या संदर्भात दिलेले निकाल विचारात घेण्यात यावेत.

मा.मुंबई उच्च / सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणात दिलेले काही महत्वपूर्ण निर्णय संदर्भासाठी पहाणेत यावेत. सोबत परिशिष्ट 'अ' जोडणेत येत आहे.

सबब, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 व त्याखालील नियम 86 अ ते 86 फ मधील तरतुदींचे आणि वरील परिपत्रकातील सूचनांचे तालुका किंवा वार्ड-स्तरीय सहायक निबंधक / उपनिबंधक आणि परसेवेवरील सहायक निबंधक/उपनिबंधक यांनी काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा संबंधितांविरूध्द आवश्यक ती कार्यवाही करणेत येईल.

(अनिल कवडे)
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी** :-

1) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (प्रशासन) सर्व.
2) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण) सर्व.
3) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त सर्व तालुक्यांमधील उपनिबंधक / सहायक निबंधक यांना तसेच आपल्या जिल्ह्यातील सर्व पतसंस्था फेडरेशन यांना सदर परिपत्रकाची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविण्यात यावी.

4) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

## मा.उच्च / सर्वोच्च न्यायालयाने विविध प्रकरणात दिलेले काही महत्वपूर्ण निकालांचा गोषवारा

(1) **रामचंद्र आणि इतर वि. कलेक्टर, नागपूर**
**1970 Mh.L.J. पान नं. 117 ते 132**

या निकालामध्ये 'Adjudication of the correctness of the claim made & certificate of recovery has to be of specified amount & amount due.' बरोबर असली पाहिजे, असे नमूद केलेले आहे.

(2) **रामकृष्ण वि. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर**
**Spl. C.A. No.271/72 (Mh.L.J. 1978) पान नं. 17**

या प्रकरणी मा.न्यायालयाने निकाल दि.13/12/77 रोजी झाला आहे. त्यात पॅरा 4 मधील निकालाचा संदर्भ देऊन असे म्हटले आहे की, Power to issue certificate postulates application of mind to facts of the case and adjudication of correctness of the claim made.

(3) **AIR 1967 Supreme court 1059 चंद्रशेखर गोस्वामी वि. गोहाट्टी बँक**
**CA No.733 of 1964 D on 14/10/1996**

या निकालात असे म्हटले आहे की, बँकेने Books Of Account जी ठेवली असतील किंवा त्याची कॉपी सादर केली असेल व जर पार्टीने त्यातील नोंदी मान्य केल्या असतील तर ठीक पण नाहीतर Evidence Act 1872 S 34 व Bankers Book Evidence Act 1891 S.4 प्रमाणे Account extract प्रमाणित (certify) केला असेल, तरच तो खाते उतारा ग्राह्य धरावा.

(4) **याचिका क्र.4101/2007 D on 24/03/2009**

Part I of Judgment Procedural Guidelines for Quassi-Judicial Authority पॅरा 17 व 18 मध्ये दिलेल्या आहेत. त्यासाठी कमिटी गठीत केलेली होती. त्यामध्येच सहकार खात्याचे नियमांचा पण उल्लेख आहे. सर्व अर्धन्यायीक कामकाज, अपील यामध्ये लागू आहे. Part I & II of judgment and Reported Judgment चे अवलोकन करावे.

(5) **याचिका क्र.2070/2010**
**श्री.विठ्ठल ल. फटांगडे विरूध्द महाराष्ट्र सरकार 2011(2) Mh.L.J.194**

या अत्यंत महत्वाच्या हायकोर्ट निर्णयामध्ये नोटीस न देणे हे अतिशय गंभीर "Gaffe" म्हणजे Blunder असे वर्णन केलेले आहे. नियम 86 अ ते 86 फ ची तरतूद नियमामध्ये होऊनही अत्यंत Perfunctory (निष्काळजीपणाने) काम चालत असल्याचे मत नोंदविले आहे व अत्यंत अवघड व कष्टप्रद काम (one side) न्यायाचे प्राथमिक ज्ञान व प्रशिक्षण नसलेले अधिकारी / कर्मचारी करीत असल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. एवढेच नाही तर सहायक निबंधक / उपनिबंधक यांना 8 अपीलकर्त्यांना प्रत्येकी रू5000/- त्यांचे पगारातून कपात करून देण्याची आज्ञा केली आहे. तसेच इतर उपनिबंधक / सहायक निबंधकांना तशा सुचना करण्यास सांगून सरकारी वकीलांनी ही बाब मा. सहकार आयुक्तांना कळवून पुर्तता करण्यास सांगितले आहे.

(6) **सुंदीप पॉलिमर्स वि. महाराष्ट्र सरकार**
**1497/2007 M.h.L.J**

या याचिकेमध्ये नियम 86 फ मधील तरतूदीप्रमाणे कारण मिमांसेसह गुणवत्तेवर आधारित निकाल देऊन मूळ अर्ज मान्य किंवा अमान्य अशी ऑर्डर करून मगच फार्म 'व्ही' मध्ये वसूली दाखला देण्याचे सांगितले आहे.

निकालात 86 अ ते 86 फ चे प्रत्येक कलमांचा अर्थ व अपेक्षा दिलेली आहे. नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन होणे अत्यंत महत्वाचे असल्याचे नमूद केले आहे.

(7) <u>2009 (4) **बी.सी.आर पान. नं.**504</u>

**<u>श्री.बसवेश्वर ना. सहकारी पतसंस्था वि. जयंत शिवपाल बनसोडे</u>**

या प्रकरणामध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या डिव्हीजन बेंचने एकाच मागणीसाठी कलम 91 अन्वये सहकार न्यायालय व कलम 101 अन्वये रजिस्टार यांचेपुढे एकाच वेळी दोन प्रकरणे चालविण्यात येऊ नये. अशा वेळी एकाच प्रकरणात दोन्ही न्यायालयांचा परस्पर विरोधी निकाल लागू शकतो त्यामुळे एकाच वेळी दोन्ही ठिकाणी प्रकरणे चालवू नये अशा स्वरूपाचा निकाल दिलेला आहे.

त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रविंद्र वा. इंगळे विरूध्द चंद्रकांत बढे पतसंस्था या प्रकरणामध्ये जर कलम 91 अन्वये सहकार न्यायालयात प्रकरण सुरू असेल तर कलम 101 अन्वये कार्यवाही प्रकरणी ती बाब निबंधक यांनी विचारात घ्यावी, अशा आशयाचा निकाल दिलेला आहे. एकाच प्रकरणात सहकार न्यायालय व निबंधक यांचे परस्पर विरोधी निकाल लागू नयेत यासाठी असे निकाल देणेत आलेले आहेत. त्यामुळे कलम 101 चे प्रकरण चालवितांना प्रकरण गुंतागुंतीचे आहे किंवा त्याबाबत सहकार न्यायालयाने काही मनाई आदेश दिलेला आहे किंवा कसे? याबद्दल काळजीपूर्वक विचार करणे अत्यावश्यक आहे.

(8) <u>**रिट पिटीशन नं.**1942/2013</u>

**<u>दि बॅसीन कॅथॉलीक को.ऑप. बँक लि. वि. राज्य सरकार व इतर दि.05/12/2015</u>**

या प्रकरणामध्ये मा उच्च न्यायालयाने अर्जदार संस्था व कर्जदार यांचे म्हणणे ऐकून कारणमिमांसेसह गुणवत्तेवर वसूली दाखला देण्यात यावा. शासनाने संस्थेतील अधिकाऱ्यांना वसूलीचे अधिकार दिलेले आहेत व त्यांची वसूली अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. तसेच असोसिएशनकडील अधिकाऱ्यांना वसूली दाखला देण्याचे अधिकार सुध्दा दिलेले आहेत. मात्र त्यांचेकडून कार्यकर्तव्ये सहकार कायद्यानुसार पार पाडले जात नाही. त्यामुळे या अधिकाऱ्याकडून कायद्यानुसार व कायद्यातील तरतूदीचे पालन होऊनच वसूली दाखला देण्याविषयी कार्यवाही व्हावी, असे राज्य शासनाला निर्देश दिलेले आहेत.

---